**शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीची कार्यपध्दती याबाबतच्या धोरणामध्ये सुधारणा.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.४०/कार्या.१२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ जुलै, २०२१

**वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही- २०११/ प्र.क्र.१३७/कार्यासन १२, दि.१७ डिसेंबर,२०१६**
**२) शासन निर्णय क्रमांक: एसआरव्ही- २०१६/प्र.क्र.५१०/ कार्यासन १२ , दि.१६ फेब्रुवारी,२०१८**

**प्रस्तावना :-**

शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्तीसाठी अटी व शर्ती आणि नियुक्तीच्या कार्यपध्दती याबाबतचे धोरण संदर्भ क्र. १ व २ शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आले आहे. मा.मंत्री (आस्थापना) यांच्या कार्यालयामध्ये विविध संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्याची मोठया प्रमाणात मागणी होते. तथापि, महसूल विभाग वाटप नियमावलीनुसार वाटप झालेल्या महसूली विभागाबाहेर प्रतिनियुक्ती अनुज्ञेय नसल्याने येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी प्रतिनियुक्ती धोरणात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सदर शासन निर्णयाद्वारे संदर्भ क्र. १ येथील **दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील परि. ५ (क) मध्ये पुढील मुद्दा क्र.(५) नव्याने अंतर्भुत करण्यात येत आहे.**

" (५) प्रतिनियुक्ती धोरणानुसार वाटप करण्यात आलेल्या महसूली विभागाबाहेर अन्य महसूली विभागात प्रतिनियुक्ती अनुज्ञेय नाही. मात्र, शासन सेवेतील कोणत्याही संवर्गातील अधिकाऱ्यांची मंत्री आस्थापना तसेच मा.विधानसभा अध्यक्ष/ उपाध्यक्ष, मा.विधानपरिषद सभापती /उपसभापती आणि मा. विरोधी पक्षनेता यांच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने नियुक्तीची मागणी झाल्यास, संबंधित अधिकाऱ्यास वाटप केलेला मूळ महसूली विभाग कायम ठेवून, उक्त आस्थापनेवरील मंजूर पदसंख्येच्या मर्यादेत प्रतिनियुक्ती अनुज्ञेय राहील. अशी कार्यवाही करताना, प्रतिनियुक्तीच्या धोरणातील अन्य अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

तथापि, सदर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपल्यानंतर, संबंधित अधिकाऱ्यास प्रतिनियुक्तीपूर्वी ज्या महसूली विभागात नियुक्ती दिली होती त्या महसूली विभागात, महसूली विभाग वाटप धोरणानुसार विहित केलेला किमान कालावधी पूर्ण करणे अनिवार्य राहील."

२. सर्व प्रशासकीय विभाग व विभागप्रमुख यांनी प्रतिनियुक्तीने नियुक्ती देताना वरील आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०७२८१६०४१५६४०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK BALIRAM MORE

Digitally signed by DEEPAK BALIRAM MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7a0a9028f5cf4e8fcecf11939b538cdb87cae4191992c32764673815b5778002, pseudonym=36EBE07887AAF8ABB98A54A5A3FE1BA090A65A5B, serialNumber=1F58034677101 8D055C7DDCC0846B3C1AC2F6340A90B4E8E3D43CD01491A17DE, cn=DEEPAK BALIRAM MORE
Date: 2021.07.28 17:41:24 +05'30'

**( दिपक मोरे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
६. मा.विधानसभा अध्यक्ष/ उपाध्यक्ष,
७. मा.विधानपरिषद सभापती /उपसभापती
८. सर्व मा.संसद सदस्य, /मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
९. मा. मुख्य सचिव,
१०. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,यांनी हे आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व शासकीय कार्यालयांच्या निर्दशनास आणावे.
११. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१२. प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१४. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा/ विधानपरिषद ) मुंबई,
१५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई व नागपूर
१६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ व २ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई व नागपूर
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
१८. ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
१९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
२२. सर्व विभागीय आयुक्त
२३. सर्व जिल्हाधिकारी
२४. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२५. निवड नस्ती.